**बातमी क्र. १**

जळगाव दि. १२ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालकपदी श्री.बी.पी.पाटील यांची निवड करण्यात आली असून सोमवारी त्यांनी प्रा.ए.बी.चौधरी यांच्या कडून या पदाची सुत्रे स्वीकारली.

सोमवार, दि.१२ नोव्हेंबर रोजी परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालक पदासाठी मुलाखती झाल्या. या मुलाखतीअंती श्री.बी.पी.पाटील यांची निवड करण्यात आली. श्री.पाटील हे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात मार्च १९९२ पासून परीक्षा विभागात संगणक केंद्र प्रमुख या पदावर कार्यरत आहेत.मध्यंतरी सोलापूर विद्यापीठात त्यांनी चार वर्षे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक म्हणून यशस्वी काम केले. त्यांना २६ वर्षाचा प्रशासकीय कामकाजाचा अनुभव आहे. शैक्षणिक व परीक्षा पध्दतीत तंत्रज्ञानाचा वापर करण्यात त्यांनी वेळोवेळी पुढाकार घेतला. सोलापूर विद्यापीठात संचालक म्हणून काम करताना या अनुषंगाने त्यांनी परीक्षा विभागात नवीन प्रयोग राबवून वेगळी ओळख निर्माण केली.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात ई-सुविधा केंद्राचे नोडल ऑफिसर म्हणून काम करताना त्यांनी भरीव योगदान दिले. मुंबई विद्यापीठातील विविध परीक्षांच्या निकालांच्या निराकरणास मदत करण्यासाठी राजभवनाने त्यांची गतवर्षी नियुक्ती केली होती. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, मुंबई विद्यापीठ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या चार विद्यापीठांमध्ये परीक्षा मूल्यमापन मंडळाचे सदस्य म्हणून देखील ते काम करीत आहेत. राजेश अग्रवाल समितीच्या शिफारसींची अंमलबजावणी करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने नियुक्त केलेल्या समितीचे सदस्य म्हणून देखील त्यांनी काम केले. इंडस् फाऊंडेशनच्या वतीने ई-गव्हर्नन्ससाठी दिला जाणारा पुरस्कार त्यांना देण्यात आला. सोलापूर विद्यापीठात संचालक म्हणून काम करताना कुलसचिव आणि वित्त व लेखाधिकारी पदाचाही अतिरिक्त कार्यभार त्यांनी काही काळ सांभाळला.

सोमवारी सायंकाळी प्रभारी संचालक प्रा.ए.बी.चौधरी यांच्याकडून त्यांनी पदभार स्वीकारला. कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, कुलसचिव भ.भा.पाटील आदींनी श्री.बी.पी.पाटील यांचे अभिनंदन केले.

..२..

**बातमी क्र. २**

जळगाव दि. १२ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात उद्या दि.१३ नोव्हेंबर पासून पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ टेबल टेनिस (महिला) स्पर्धांना प्रारंभ होत असून पाच राज्यांमधील ६९ विद्यापीठांचे खेळाडू स्पर्धेत सहभागी होत आहेत.

उद्या मंगळवार, दि. १३ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या क्रीडा संकुलातील इनडोअर हॉलमध्ये कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्‌घाटन होणार आहे. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य व स्पर्धेचे कार्याध्यक्ष दिलीप पाटील यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. १३ ते १६ नोव्हेंबर दरम्यान होणाऱ्या या स्पर्धेत महाराष्ट्र, गुजरात, गोवा, राजस्थान, मध्यप्रदेश या पाच राज्यांमधील ६९ विद्यापीठांचा सहभाग असणार आहे. यामध्ये ३५० महिला खेळाडू, १४० व्यवस्थापक/प्रशिक्षक आणि २० पंच असे एकूण ५१० जण असणार आहेत. उद्या मंगळवारी उद्‌घाटनानंतर पहिला सामना प्रवरा इन्स्टिटयूट ऑफ मेडिकल सायन्सेस्, लोणी विरुध्द गोविंद गुरु ट्रायबल विद्यापीठ, बनसवारा (राजस्थान) यांच्यात होणार आहे. रोज सकाळी ७.३० ते १.०० आणि दुपारी २.०० ते रात्री ८ या वेळेत होणाऱ्या या स्पर्धेत पहिले तीन दिवस बाद फेरीतील सामने होतील. त्यानंतर साखळी सामने होणार आहेत.

विद्यापीठाच्या इनडोअर हॉलमध्ये या स्पर्धा होणार असून स्पर्धेची तयारी पूर्ण झाली आहे. सोमवार सायंकाळपर्यंत २५ विद्यापीठांचे संघ विद्यापीठात दाखल झाले आहेत. स्पर्धेसाठी विविध प्रकारच्या समित्यांचे गठण करण्यात आले असून कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, कुलसचिव भ.भा.पाटील यांच्या उपस्थितीत समित्यांच्या कामांचा आढावा घेण्यात आला. पहिल्या दिवशी चार गटांमध्ये ४५ सामने होणार आहेत अशी माहिती क्रीडा संचालक व संयोजक सचिव डॉ.दिनेश पाटील यांनी दिली.

---

जा.क्र . : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 12 नोव्हेंबर, 2018

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी